मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्री चित्रण : एक विवेचक अभ्यास
(विशेष संदर्भ - बी. रघुनाथ, नागनाथ कोत्तापल्ले, रा.रं. बोराडे, गणेश आवटे यांच्या कादंबऱ्या)

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेंतर्गत मराठी विषयात
पीएच.डी. पदवीकरिता सादर करण्यात येणाऱ्या
शोधप्रबंधांचा आराखडा

* संशोधक विद्यार्थिनी *
प्रा. संध्या विश्वनाथ जंजाळ
मातोश्री उच्च माध्यमिक विद्यालय,
महागांव, ता. महागांव, जि. यवतमाळ

* संशोधन मार्गदर्शक *
डॉ. माधव राघोजी जाधव
मराठी विभागप्रमुख,
नारायणराव वाघमारे महाविद्यालय,
आखाडा बाळापूर, ता. कळमनुरी, जि. हिंगोली

नोव्हेंबर २०१७

मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्री चित्रण : एक विवेचक अभ्यास
(विशेष संदर्भ - बी. रघुनाथ, नागनाथ कोत्तापल्ले, रा.रं. बोराडे, गणेश आवटे यांच्या कादंबऱ्या)

प्रस्तावना

'कादंबरी' हा मराठी साहित्यातला महत्त्वाचा व समग्र मानवी जीवनाला कवेत घेणारा वाङ्मयप्रकार. कथानक, पात्रचित्रण, वातावरणनिर्मिती, संवाद, भाषाशैली आदी घटकांच्या साहाय्याने आकाराला येतो. पुढे या वाङ्मयप्रकाराचे अनेक प्रकार आपणास सांगता येतील.

आपण जे जीवन जगतो, ज्या जगात राहतो, त्याबद्दल कुतूहल वाटणे, हा उपजत मनुष्य स्वभाव आहे. मनुष्याचे वागणे, त्यांच्या बोलण्या-चालण्याचा इतरांवर होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया हे सर्व जाणून घ्यायला तो उत्सुक असतो. ही उत्सुकता कादंबरीद्वारे बव्हंशी पूर्ण होऊ शकते. कादंबरीत वास्तवतेबरोबरच कल्पकतेलाही बराच अवसर असतो. लेखक कल्पनेचे साहाय्य घेऊन कांदबरीत रंजकता आणण्याचा प्रयत्न करीत असतो. कादंबरीत इतर सर्व वाङ्मयप्रकारात जी लोकप्रियता लाभली तिचे कारण हेच आहे.

अगदी एवढेच नाही, तर ग्रामीण कादंबरी ही मराठी कादंबरीला प्राप्त झालेले वैभव आहे. ग्रामीण साहित्याला आनंद यादवांनी चळवळीचे आणि विचारजागृतीचे रूप दिल्यामुळे ग्रामीण साहित्याचे वेगळेपण ठळकपणे लक्षात घेणे मराठी समीक्षेला भाग पडले आहे. त्याचाच एक चांगला परिणाम म्हणून आज सबंध मराठवाड्यात ग्रामीण साहित्याची व्यापक चळवळ उभी राहू शकली आणि खेड्यापाड्यातून आपापल्या ग्रामानुभवाला साकार करणारे लेखकही निर्माण झाले. अभिरुची, अभिव्यक्ती, निर्मिती ह्या अंगाने ग्रामीण कादंबरीमध्ये झालेले परिवर्तन हे ग्रामीण साहित्याचे आणि ग्रामीण कादंबरीचेही आत्मबळ वाढविणारे आहे.

विषयाचे महत्त्व व निवड

महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' असे सांगितले. भारताचा आत्मा खेड्यात आहे. या उपदेशामुळे ग्रामीण साहित्याच्या निर्मितीवर मराठवाड्याच्या ग्रामीण लेखकांनी त्यांच्या साहित्यातून लोकांना अंतर्मुख केले. मराठवाडा हा महाराष्ट्राच्या गोदावरी खोऱ्यात आणि आसपास वसलेला एक प्रदेश. येथील ३० टक्के लोकसंख्या आर्थिक दृष्टीने दारिद्र्य रेषे-खालील आहे. कोरडवाहू शेतीचे प्रमाण ९० टक्यांवर असून, हेच येथील लोकांच्या उदर-निर्वाहाचा प्रमुख मार्ग आहे. मराठवाड्याचे सामाजिक जीवन संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. एवढेच नाही, तर महाराष्ट्रातील इतर प्रांतांप्रमाणे इथेही पुरुषप्रधान संस्कृती प्रत्ययाला येते. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन कमीपणाचा आहे, तिचे अस्तित्व 'चूल आणि मूल' इथ-पर्यंतच सीमित ठेवले गेले. तिला स्वतःचं स्वतंत्र असं अस्तित्व कधी असत नाही. असलं तरी दाखवता येत नाही. एवढं प्रचंड वर्चस्व पुरुषाचं स्त्रीवर आहे. स्वातंत्र्याच्या साठ वर्षांनंतरही घटनेने दिलेला स्वातंत्र्याचा अधिकार स्त्रीला मिळालेला दिसत नाही. तसेच ती स्वतंत्रपणे विचारही करताना दिसत नाही. याचे कारण काय असावे? साहित्य हे समाजमन घडवित असते. मग मराठी ग्रामीण कादंबरीने हे घडविले आहे का? या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधातून मला ग्रामीण कादंबरीतील स्त्रीचित्रणाचा शोध घेण्याची गरज वाटली. त्यातून मी **"मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्री चित्रण : एक विवेचक अभ्यास (विशेष संदर्भ - बी. रघुनाथ, नागनाथ कोत्तापल्ले, रा.रं. बोराडे, गणेश आवटे यांच्या कादंबऱ्या)"** या अनुषंगाने संशोधन करण्याचे ठरविले. प्रस्तुत विषय महत्त्वाचा असून तो दुर्लक्षित असल्याचे जाणवले.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या संशोधन विषयाचा अभ्यास करताना मी संशोधनमान्य संशोधन पद्धतीचा अवलंब करणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१) मराठी कादंबरी व ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करणे.

२) मराठवाड्याच्या प्रादेशिक आणि समाजवास्तवाचा अभ्यास करणे.

३) मराठवाड्याच्या समाजव्यवस्थेतील स्त्रीचे स्थान निश्चित करणे.

४) पुरुषप्रधान संस्कृतीतील समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन लक्षात घेणे.

५) ग्रामीण कादंबरीतून प्रतिबिंबित होणाऱ्या स्त्रीच्या जीवनसंघर्षाचा अभ्यास करणे.

६) बदलत्या परिस्थितीनुसार स्त्रीच्या जीवनात झालेले परिवर्तन शोधणे.

७) ग्रामीण साहित्य लेखकातील बी. रघुनाथ, नागनाथ कोत्तापल्ले, रा.रं. बोराडे, गणेश आवटे यांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणाऱ्या स्त्री चित्रणाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके

१) मराठवाडा आणि भूप्रदेशाचे चित्रण ग्रामीण कादंबरीत आले आहे.

२) मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतून स्त्रियांचे भावविश्व चित्रित झाले आहे.

३) मराठवाड्याच्या समाजजीवनातील स्त्रीचे बदलते रूप ग्रामीण कादंबरीने चित्रित केले आहे.

४) मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतून स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा कमीपणाचाच आहे.

५) बदलत्या समाजवास्तवानुषंगाने स्त्रीच्या जीवनात फारसे परिवर्तन झाले नाही.

संशोधनाच्या मर्यादा

या संशोधनात केवळ मराठवाड्यातील साहित्यिकांच्या ग्रामीण कादंबरीकारांतील बी. रघुनाथ, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, रा.रं. बोराडे आणि गणेश आवटे यांच्याच कादंबऱ्यांच्या आधारे स्त्री चित्रणाचा शोध घेतला जाणार आहे. शोधप्रबंधाची मांडणी पुढील प्रकरणांत करण्यात येईल.

संशोधनाची रूपरेखा

प्रकरण पहिले - मराठी कादंबरी आणि ग्रामीण कादंबरी : एक मागोवा

प्रस्तुत प्रकरणात मराठी वाङ्मयात असणारे कादंबरी वाङ्मयप्रकाराचे महत्त्व स्पष्ट करण्या येणार आहे. कादंबरी म्हणजे काय? ग्रामीण कादंबरीची सुरुवात, ग्रामीण कादंबरीची संकल्पना, ग्रामीण कादंबरीचे स्वरूप, मराठी कादंबरी आणि ग्रामीण कादंबरीलेखनाचा आढावा या प्रकरणात घेण्यात येईल. यात प्राधान्याने स्त्री चित्रणाच्या कादंबऱ्यांचा समावेश करण्यात येईल. प्रकरणांती महत्त्वपूर्ण निष्कर्ष नोंदविले जातील.

प्रकरण दुसरे - मराठवाडा : प्रादेशिकता आणि समाजवास्तव

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला विषय हा मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्री चित्रण असा असल्याने महाराष्ट्रातील मराठवाडा या विभागाचे वेगळेपण शोधण्याचा प्रयत्न या प्रकरणात करण्यात येईल. हे वेगळेपण येथील सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक परिस्थितीच्या आधारे शोधण्यात येईल. मराठवाड्यात स्वातंत्र्यानंतर जो बदल झाला, तो ग्रामीण कादंबरीकारांनी चित्रित केला आहे का? हेही या प्रकरणात स्पष्ट करण्यात येईल.

मराठवाड्याच्या सीमा, भौगोलिकता, प्रादेशिकता, जनजीवन आणि कृषिसंस्कृतीचा थोडक्यात आढावा या प्रकरणात घेतला जाईल.

प्रकरणांती महत्त्वाचे निष्कर्ष नोंदविण्यात येतील.

प्रकरण तिसरे - निवडलेल्या लेखकांच्या ग्रामीण कादंबऱ्यांचे स्वरूप

ग्रामीण कादंबरीची सुरुवात ही स्वातंत्र्यपूर्व काळात झाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात खेड्यातील शिकलेला तरुण लेखन करू लागल्याने तो आपले गाव आणि परिसर साहित्यातून चित्रित करू लागला. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर ग्रामीण कादंबरीला वेगळेपण प्राप्त झाले. स्वातंत्र्य प्राप्त होणाच्या काळातच यातील बी. रघुनाथ कादंबरी लेखन करीत होते, तर स्वातंत्र्यानंतर नागनाथ कोत्तापल्ले, रा.रं. बोराडे आणि गणेश आवटे यांनी कादंबरीलेखन केले.

या कादंबरीकारांच्या संपूर्ण ग्रामीण कादंबऱ्यांचे स्वरूप या प्रकरणात विशद करून काही मुद्यांच्या आधारे या कादंबऱ्यांचे वेगळेपण स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरणांती महत्त्वाचे निष्कर्ष नोंदविले जातील.

प्रकरण चौथे - ग्रामीण कादंबरीतून आलेले स्त्री चित्रण

मराठवाड्यातील समाजजीवनाचा अभ्यास करताना स्त्रीचे भावविश्व, तिचे कुटुंबातील आणि समाजव्यवस्थेतील स्थान, स्त्री-पुरुष विषमता, स्त्रीला दिला जाणारा कमी दर्जा इ. घटकांच्या आधारे मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्री चित्रणाचा शोध घेण्यात येईल. हा शोध प्रातिनिधीक स्वरूपात चारच लेखकांच्या कादंबऱ्यांधारे घेण्यात येईल.

प्रकरणांती महत्त्वाचे निष्कर्ष नोंदविले जातील.

प्रकरण पाचवे - निष्कर्ष व समारोप

प्रस्तुत प्रकरणात या संशोधनातून हाती आलेले निष्कर्ष नोंदविले जातील.

आधारभूत कादंबऱ्या

१) ‘ओ’ - बी. रघुनाथ (१९३९)
२) ‘हिरवे गुलाब’ - बी. रघुनाथ (१९४३)
३) ‘बाबू दडके’ - बी. रघुनाथ (१९४४)
४) ‘उत्पात’- बी. रघुनाथ (१९४५)
५) ‘म्हणे लढाई संपली’ - बी. रघुनाथ (१९४६)
६) ‘जगाला कळले पाहिजे’ - बी. रघुनाथ (१९४६)
७) ‘आडगावचे चौधरी’ - बी. रघुनाथ (१९५४)
८) ‘देवाचे डोळे’ - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
९) ‘उलट चालिला प्रवाहो’ - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
१०) ‘मध्यरात्र’ (दुसरी आवृत्ती) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
११) ‘गांधारीचे डोळे’ - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
१२) ‘काळोखाचे पडघम’ - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
१३) ‘पराभव’ (दुसरी आवृत्ती) - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
१४) ‘पाचोळा’ - रा.रं. बोराडे
१५) ‘आयुष्याच्या सायंकाळी’ - रा.रं. बोराडे
१६) ‘आमदार सौभाग्यवती’ - रा.रं. बोराडे
१७) ‘वळणाचं पाणी’ - रा.रं. बोराडे
१८) ‘चारापाणी’ - रा.रं. बोराडे
१९) ‘मरणदारी’ - रा.रं. बोराडे
२०) ‘रहाटपाळणा’ - रा.रं. बोराडे
२१) ‘इथं होतं एक गांव’ - रा.रं. बोराडे
२२) ‘रिक्त अतिरिक्त’ - रा.रं. बोराडे
२३) ‘भिरूड’ - गणेश आवटे
२४) ‘पाणसळ’ - गणेश आवटे
२५) ‘चुकार’ - गणेश आवटे
२६) ‘गणगोत’ - गणेश आवटे

संदर्भ ग्रंथसूची

१) मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास - प्रा. बापट व गोडबोले
२) ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या - डॉ. आनंद यादव
३) ग्रामीण साहित्य - स्वरूप आणि शोध - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
४) ग्रामीण आणि प्रादेशिक कादंबरी : संकल्पना आणि स्वरूप - डॉ. मदन कुलकर्णी
५) मराठी कादंबरीचा इतिहास - चंद्रकांत बांदिवडेकर
६) ग्रामीण साहित्य आणि वास्तव - डॉ. आनंद यादव
७) ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि प्रेरणा - वासुदेव मुलाटे
८) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड-१, २) - डॉ. अ.ना. देशपांडे
९) गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी - संपा. डॉ. विलास खोले
१०) कादंबरीविषयी - डॉ. हरिश्चंद्र थोरात
११) कादंबरीची रचना - श्री. मा. कुलकर्णी
१२) वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश - संपा. प्रज्ञा गाणोरकर व इतर
१३) कादंबरी आणि मराठी कादंबरी - डॉ. उषा हस्तक
१४) ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव - डॉ. आनंद यादव
१५) ग्रामीण साहित्य - रा.रं. बोराडे
१६) ग्रामीण साहित्य - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
१७) ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास - संपा. प्रा. चंद्रकुमार नलगे
१८) निवडक बी. रघुनाथ (समीक्षण) - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
१९) पाचोळा (समीक्षण) - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

संशोधन मार्गदर्शक

डॉ. माधव राघोजी जाधव
मराठी विभागप्रमुख,
नारायणराव वाघमारे महाविद्यालय,
आखाडा बाळापूर, ता. कळमनुरी, जि. हिंगोली

संशोधक विद्यार्थिनी

प्रा. संध्या विश्वनाथ जंजाळ
मातोश्री उच्च माध्यमिक विद्यालय,
महागांव, ता. महागांव, जि. यवतमाळ